
# सावली

पाहिलं जेव्हा पहिल्यांदा तुला तेव्हाच मला भावली,
दुसरं तिसरं कोणी नाही तू आहेस माझी सावली.
दिसतेस कधी तू दृश्य तर कधी अदृश्य रूपात,
चाल असेल तेव्हा माझी दिमाख्यात आणि तोऱ्यात.
असतेच नेहमी तू माझ्या अवती भोवती,
एकटं असतानाही त्यामुळे वाटत नाही भिती.
घडणाऱ्या प्रत्येक क्षणांची तू आहेस साक्षीदार,
म्हणूनच आहे मला तुझा कायम आधार.
तुझी आणि माझी आहे आयुष्यभराची साथ,
एकमेकींशिवाय आपली अधुरी आहे गाठ.
धरू आपण हातात हात एकमेकींचा
खेळ खेळू एकत्र हा खेळ सावल्यांचा

आरती ज. भगत
कोथरूड, पुणे.



श्री. प्रकाश देशपांडे